Exh.1/C

दैनिक रजि. नं.     /२०२६

Cr.M.A.628/2026

दाखल तारीख  १६/०४/२०२६

क्रिमी. किरकोळ अर्ज नं.     /२०२६

# मे. मुख्य न्यायदंडाधिकारीसाो, कोल्हापूर

यांचे कोर्टात.....

KASHYAP MANGAL DEEPAK

Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.07.06 17:49:13 +0530

Order
Call Say of
I.O. & A.P.P.
C.J.M.
24/04/26

श्री. सतिश पांडुरंग वर्णे
व.व.४०, धंदा — व्यवसाय,
रा. हस्तीनापूर नगरी, प्लॉट नं. ५२/५३,
सुर्वे नगर, पोतदार हायस्कुल जवळ,
कळंबा रिंग रोड, कोल्हापूर
} अर्जदार

विरूध्द

महाराष्ट्र सरकार द्वारा
करवीर पोलिस ठाणे
} वि.प.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे करवीर पोलिस स्टेशन सायबर गुन्हा कंप्लेट डिटेल्स नं. ३१९०४२६००७६३७० व कंप्लेट डिटेल्स नं. ३१९०४२६००७६३३१

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

यातील अर्जदार यांचा विनंती अर्ज की,

१) यातील अर्जदार हे वर नमुद पत्यावर कायम स्वरूपी रहिवास करीत आहेत. यातील अर्जदार यांचे व्हॉट्सअॅप वरती एफ एक्स ट्रेड या नावाने करन्सी टेड्रींगच्या संदर्भात माहिती देण्यात आली. त्यानंतर यातील अर्जदार यांचा एफ एक्स ट्रेड यांचेशी संपर्क होवून त्यांनी त्यांचे व्यवसायाबद्दल संपुर्ण माहिती अर्जदार यांना सांगितली व पैश्याची गुंतवणुक करणेस व त्याबद्दल्यात आकर्षक परतावा देणेबाबतची हमी व खात्री दिली. यातील अर्जदार यांनी एफ एक्स ट्रेड यांच्या प्रतिनिधीशी बोलणे झालेनंतर त्यांनी अभिषेक कुमार खाती व पिंटूसिंग मेवाड यांचे खातेवर पैसे जमा करणेस सांगितले. त्याप्रमाणे यातील अर्जदार यांनी या दोघांच्या खातेवर पैसे जमा केलेले आहेत.

२. यातील अर्जदार यांनी सदरचे पैसे यु.पी.आय. प्रणालीद्वारे व आयएमपीएस प्रणालीद्वारे ट्रान्सफर केलेले आहेत. यातील अर्जदार यांनी अॅक्सीस बॅंक शाखा गांधीनगर–उचगांव, कोल्हापूर व अर्जदार यांचे पत्नी सौ. स्नेहल सतिश वर्णे यांचे खाते असलेली बॅंक अॅक्सीस बॅंक शाखा गांधीनगर–उचगांव, कोल्हापूर यांचे दोघांच्या खातेवरून एकूण रक्कम रू. ८,२३,४७०/– इतकी रक्कम एफ एक्स ट्रेड यांना दिलेली आहे. यातील अर्जदार यांनी सदरची रक्कम एफ एक्स ट्रेड यांचे तर्फे पैसे स्विकारणारे इसम पिंटूसिंग मेवाड यांचे खाते असलेले बॅंक ऑफ इंडिया व अभिषेक खाती यांचे इको बॅंकवरती ट्रान्सफर केलेले आहे.

३) यातील अर्जदार व त्यांच्या पत्नी सौ. स्नेहल सतिश वर्णे यांचे खातेवरून दिलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे:–

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

| अ. नं. | रक्कम | तपशिल | अर्जदार यांचे बॅंकेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ९७,०००/— | आयएमपीएस दि.२६/०३/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| २ | २,२५,०००/— | आयएमपीएस दि.०६/०४/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ३ | २,२५,०००/— | आयएमपीएस दि.०८/०४/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ४ | २,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. १७/०२/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ५ | १८,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. १७/०२/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ६ | २५,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. २१/०२/२०२६ | ॲक्सीस बॅंक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | ४५,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. १९/०३/२०२६ | ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ८ | ५८,२३५/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. २१/०३/२०२६ | ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| ९ | ५८,२३५/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. २३/०३/२०२६ | ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| १० | ४०,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. २१/०३/२०२६ | ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| १० | ३०,०००/— | गुगल पे— यु.पी.आय. प्रणालीद्वारे दि. २५/०२/२०२६ | ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर—उचगांव, कोल्हापूर |
| | ८,२३,४७०/— | एकूण | |

वरील तपशिलामध्ये नमुद केलेली रक्कम यातील आरोपी यांना अर्जदार यांनी दिलेली आहे.

४. यातील अर्जदार यांनी एफ एक्स ट्रेड या रक्कम देवून देखील त्यांनी परतावा दिलेला नाही. तसेच अर्जदार यांची फसवणुक केलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांनी एफ एक्स ट्रेड यांचे विरूध्द करवीर पोलिस स्टेशन, सायबर क्राईम सेल यांचेकडे

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

तक्रार दाखल केलेली आहे. सदरची तक्रार ही दि १२/०४/२०२६ इ.रोजी दाखल केलेली आहे. त्यांचा ॲक्नॉलजमेंट नं. ३१९०४२६००७६३७० व ३१९०४२६००७६३३१ असा आहे.

५. यातील अर्जदार यांनी पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केलेनंतर यातील एफ एक्स ट्रेड यांचे तर्फे पैसे स्विकारणारे इसम पिंटूसिंग मेवाड आणि अभिषेक कुमार खाती यांचे बॅक खाते फ्रिझ/गोठविलेले आहे व सदरच्या दोन्ही बॅक खातेवर एकूण रक्कम रू.५,०६,७८०/—इतकी रक्कम गोठविलेली आहे. सदरची रक्कम यातील अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला आहे.

६. यातील अर्जदार यांनी सदरची रक्कम मिळणेबाबतची कारणे खालीलप्रमाणे:—

१) यातील फसवणुक करणार यांनी नियोजनबद्धरित्या अर्जदार यांना जादा परताव्याचे आमिष दाखवून फेक ॲपद्वारे ऑनलाईन यंत्रणेचा गैरफायदा घेवून अर्जदार यांची फसवणुक करुन अर्जदार यांची रक्कम हडप करणेच्या उद्देशाने खोटी माहिती देवून फसवणुक करुन रक्कम वर्ग करणेस भाग पाडलेले आहे.

२) सदरची रक्कम ही अर्जदार यांना न मिळालेस अर्जदार यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

३) यातील अर्जदार यांचे खात्यावरुन सदरची रक्कम बेकायदेशीर व फसवणुकीद्वारे वर्ग करुन घेतलेमुळे अर्जदार यांचा फार मोठे आर्थिक नुकसान झाले असून सदर रक्कम जर अर्जदाराच्या

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

खात्यावर वर्ग झाली नाही तर अर्जदार यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

४) यातील अर्जदार यांच्या मालकीची रक्कम ही फसवणुक करणा—यांच्या खात्यावर तशीच राहिलेस फसवणुक करणारे हे संगणकीय प्रणालीचा दुरुपयोग करुन ती रक्कम बेकायदेशीरपणे अन्य खात्यावर वर्ग करणेची दाट शक्यता आहे. तसे झालेस अर्जदार यांचे फार मोठे नुकसान होणार आहे.

५) सदर कामी होल्ड/फ्रीज असणारी रक्कम ही अर्जदार यांच्याच मालकीची असून त्याच्याशी अन्य कोणाचाही, कसलाही संबंध नाही. त्यामुळे ती रक्कम अर्जदार यांच्या खात्यावर परत वर्ग होणे अत्यंत आवश्यक आहे.

६) सदरची रक्कम जर तशीच खात्यावर राहिलेस अर्जदार यांचे फार मोठे नुकसान होणार आहे.

७) सदर रक्कम अर्जदार यांच्या ताबेत दिलेनंतर अर्जदार हे त्या रक्कमेचा दुरुपयोग करणार नाहीत. तसेच मे.कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे जर भविष्यात मे.कोर्टात भरणेचा आदेश झालेस त्या आदेशाचे पालन करतील.

८) सदरची रक्कम अर्जदार यांच्या खात्यावर वर्ग करताना घातलेल्या अटी व शर्तीचे पालन अर्जदार हे करतील.

९) सदर रक्कम अर्जदार यांच्या खात्यावर वर्ग करताना मे.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे द्यावयाचा इंडेमनीटी बॉंड देणेस अर्जदार या तयार आहेत.

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

१०) अर्जदार यांचे खातेबाबत मे.कोर्टास काही माहिती हवी असलेस अर्जदार सदरची माहिती वेळोवेळी मे.कोर्ट आदेश करतील त्यावेळी मे.कोर्टात हजर राहून माहिती देणेस तयार आहेत.

११) सबब अर्जदार यांची मे. कोर्टास विनंती की,

अ) अर्जदार यांचे सायबर क्राईम ॲक्नॉलजमेंट नं. ३१९०४२६००७६३७० प्रमाणे रक्कम रू. २,७६,४७०/— ही होल्ड अथवा फ्रिज केलेली रक्कम व ॲक्नॉलजमेंट नं. ३१९०४२६००७६३३१ प्रमाणे रक्कम रू. २,३०,३१०.६५/— इतकी रक्कम अर्जदार यांचे खाते असलेले ॲक्सीस बॅक शाखा गांधीनगर उचगाव येथील बॅक खाते नं. ९१४०१००४७१८५२२६ या खातेवर वर्ग करणेचा वि.प. व अर्जात नमुद केलेल्या बँकांना आदेश व्हावा.

ब) इतर अनुषंगिक हुकूम याच कामी अर्जदार यांचे बाजूने व्हावेत.

कोल्हापूर

ता.१६/०४/२०२६

अर्जदार

ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार श्री. सतिश पांडुरंग वर्णे व.व.४०, धंदा — व्यवसाय, रा. हस्तीनापूर नगरी, प्लॉट नं. ५२/५३, सुर्वे नगर, पोतदार हायस्कुल जवळ, कळंबा रिंग रोड, कोल्हापूर शपथेवर

Assistant Superintendent
Chief Judicial Magistrate Court
Kolhapur.

ॲफिडेव्हीट करतो कि, वर नमुद केलेल्या अर्जातील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरहू जप्त मुद्देमाल चलनी नोटा या माझे मालकीचे आहे म्हणून केले शपथेवर ॲफिडेव्हीट आज मुा कोल्हापूर

दि.१६/०४/२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो ॲफिडेव्हीट करणार

ॲड. प्रणिल पी. कालेकर

प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार श्री. सतिश पांडुरंग वर्णे व.व.४०, धंदा – व्यवसाय, रा. हस्तीनापूर नगरी, प्लॉट नं. ५२/५३, सुर्वे नगर, पोतदार हायस्कुल जवळ, कळंबा रिंग रोड, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो कि, वर अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा कोल्हापूर

दि.१६/०४/२०२६ प्रतिज्ञा करणार

Solemnly affirmed before me by
Shri Satish Pandurang Varne
Age 40 Occup. Business
R/o Kalamba Ring Road Kolhapur
who is identified by Shri P.P.
Kalekar. Adv. wh
personally know.
Dates 16/04/2026

Assistant Superintend
Chief Judicial Magistrate C
Kolhapur